# घरकुल आनंदयात्रा

त्रैमासिक पत्रिका

अंक २ रा (जुलै ऑगस्ट सप्टेंबर २०२३)



आनंद नगर, त्रिंबक रोड, पिंपळगाव बहुला, नाशिक ४२०२१३ |संपर्क : ९८६०५५२३२४

Email : gharkulparivar@gmail.com l Web : www.gharkulparivar.org


## संपादकीय ...

सप्रेम नमस्कार.

घरकुल आनंदयात्रा या त्रैमासिकाच्या पहिल्या अंकाचे आपण स्वागत केले. या त्रैमासिकाच्या e- Copy च्या निमित्ताने अनेक नव्या जुन्या स्नेही हितचिंतकांना जोडण्याची संधी मिळाली. पहिला अंक आपल्या सर्वांनी आपापल्या मोबाईलवर सविस्तर वाचला असेलच हा दुसरा अंक आपल्या हाती देताना आनंद यात्रेच्या संपादक मंडळास अत्यंत आनंद होत आहे.

मागील अंकाप्रमाणेच याही अंकात घरकुल मध्ये आयोजित झालेले विविध कार्यक्रम, उपक्रम, भेटीगाठी, शिक्षिका विद्यार्थिनी यांची माहिती, कविता, अनुभव आणि काही क्षणचित्र अशा सर्व गोष्टींचा समावेश आहे पालकांना व सर्व स्नेहिजनांना विनंती आहे की या अंकाविषयी आपले मत सूचना यांचे आम्ही अगत्याने स्वागत करू

***

-: संपादकीय मंडळ :-

| | |
|---|---|
| सौ. सुनिता आडके | सौ. साधना देशमुख |
| सौ. विद्या फडके | सौ. वल्लरी प्रधान |
| श्री. नरेश महाजन | सौ. सोनल खाडिलकर |

***



**“लक्ष लक्ष दिव्यांनी उजळुन निघो ही निशा<br>घेऊनि येवो नवी उमेद, नवी आशा,<br>सोबत आमच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!”**

# आऊ-माऊचे दिवस

"घरटं" किती महत्त्वाचं असतं मग ते चिमणीचं असो वा माणसांचं.

गेल्या अंकात आपण घरकुलला घरटं कसे मिळालं ही गोष्ट पाहिली. त्याच घरट्यातील काही आठवणींचा हा थोडासा मागोवा. हा भला मोठा बंगला आम्हाला महाराज बिरमाणी यांच्या सहकार्याने मिळाला. पहिल्यांदा तो भाड्याने घेतला होता. पुढे तर महाराजांनी तो विकतच घेऊन टाकला. आणि आम्हाला राहायला दिला . यामध्ये आम्ही चार-पाच वर्षे होतो.

या पहिल्या घरट्यातील दिवस खरंच खूप छान होते. नाशिकरोडकडे जाताना अश्विन सोसायटीत हा बंगला आहे .आजूबाजूला बरेच बंगले, घरं आहेत. तेथील सर्व रहिवासी अतिशय चांगले मिळाले. घरकुलबद्दल त्यांना खूप जिव्हाळा निर्माण झाला. येता-जाता घरकुल मध्ये ते डोकवायचे, मुलींशी गप्पा मारायचे. त्यामुळे मुलींनाही खूप बरं वाटायचं. आपल्याला कुणीतरी आपुलकीने विचारावं ही भावना खूप आनंद देणारी असते. त्यामुळे मुलींची ही मंडळी चौकशी करायची, त्यांच्याशी दोन शब्द बोलायचे त्यामुळे त्या मुलीही खूप खुश होत होत्या .

घरकुलमध्ये आमची घरघंटीही होती .त्यामुळे बरेच जण त्या परिसरातील आमच्या घरघंटीतून दळण घेऊन जायचे .त्यामुळेही अनेकांचा सहवास वाढला .कधी कुणाला गरज वाटली तर ते घरकुल मधून पोळी भाजीचा डबा घेऊन जायचे.

घरकुलबद्दल तिथल्या शेजाऱ्यांना किती काळजी होती हे एका छोट्या उदाहरणावरून सांगता येते. तिथे आऊ-माऊच्या शेजारच्या बंगल्यात बिबट्या गॅरेजमध्ये बसला होता. तेव्हा फडकरांनी लगेच येऊन मुलींना बाहेर येऊ देऊ नका, दार बंद करा हे अगदी काळजीने सांगितले आणि ते श्वापद पकडले जाईपर्यंत स्वतः तेथे थांबले .

तर असा हा जिव्हाळा निर्माण झाल्यामुळे हा बंगला सोडताना आम्हाला अतिशय वाईट वाटले होते.

नंतर आम्ही आलो पाथर्डी फाट्याला एक नवीन घरट्यात...

**त्याबद्दल पुढील भागात . . .**





# The "strongest" pillar of Gharkul



Shri Suri Narayan, Director of Fortuna Engineering Company Nashik, is one of the strong pillars of Gharkul. Shri Narayan ji and his better half Uma bhabhi are with us since day one when the Gharkul journey began.

Their beloved daughter "Pooja" was a special child. Mr. & Mrs. Narayan were very much aware about the problems of the parents of these special children.

Shri Suri Narayan came forward to help the needy parents,who were financially unstable and approached Gharkul, for admitting their special girl child.

Since then until today, Mr.& Mrs. Narayan is shouldering the responsibility of four girls from Gharkul.

They have also given donations for constructing one room in Gharkul new premises.

This couple has not only supported us financially but Uma bhabhi has also taken interest in working with our girls. She has conducted workshops for our teachers and caretakers on "Accupressure as a healing treatment", Sujok therapy, Mudra therapy, Colour therapy are taught by Uma bhabhi to our staff. Our staff practices some of these therapies on daily basis which contributes in providing relief to our students.

Every year they buy Ganesh murti from Gharkul made by our special girls. They are always there to support us. Their blessings and love is very very precious for "Gharkul parivar" and our students.

**Smt. Vidya Phadakay**

---

# Greetings Of Gratitude . . .

Dear friends, Donors, and Supporters,

We are overwhelmed with gratitude for your unwavering commitment to our NGO's mission. Your generosity and dedication have been the driving force behind our success, enabling us to make a real impact in the lives of those in need. Your support has not only transformed the lives of countless individuals but also filled our hearts with hope and inspiration. We couldn't have done it without you, and for that, we are profoundly thankful. Together, we will continue to make the world a better place.

## एकेकीची गोष्ट:- रेणुका देशपांडे

रेणुका घरकुलची पहिल्या दिवसापासूनची विद्यार्थिनी. रेणुकाला आई नाही. वडील पुण्याला दुसऱ्या बहिणीकडे असतात. नव्वदीचे आहेत या चार बहिणी रेणुका सर्वात लहान.

रेणुका बॉर्डर लाईनची व आमच्या दृष्टीने अतिशय गुणी व आज्ञाधारक विद्यार्थिनी. रेणुका सोपी पुनरावृत्तीची अनेक कामे चांगल्या प्रकारे करू शकते व तिच्या वर्तन समस्या काही नाहीत म्हणून मनात आले की रेणुका बाहेर काम करू शकेल तिच्यासाठी प्रयत्न करूया. मग शोध घेत असता के.वाय.असेंबल्सच्या कविता दगावकर यांच्याशी सविस्तर चर्चा झाल्यावर तिने ट्रायलसाठी रेणुकाला जॉब दिला आणि तिने चांगले काम करून दाखवले पुढे जवळ जवळ सात वर्ष रेणुका त्यांच्याकडे वायर मेजरमेंटचे व केबलिंगचे काम करत होती व दरमहा 4 हजार रुपये कमवत होती. मामू शिवपार्वती प्रतिष्ठान तर्फे रेणुकाला आदर्श विद्यार्थिनीचा पुरस्कारही मिळाला. एका कृषी प्रदर्शनाचे तिच्या हस्ते उद्घाटन झाले. रेणुका कविता छान म्हणते, घरकुलची सर्व शिस्त पाळते व सर्वांशी अत्यंत नम्रतेने व आदराने वागते. घरकुलची गुणी लेक आहे.

रेणुका गेटवरती वॉचमनचे कामही छान करते. घुले मावशींनी तिला एन्ट्री कशी घ्यायची वगैरे गोष्टी शिकवल्या, ती अत्यंत आवडीने ते काम करते.

## -: विश्वासू सहकारी :-



**सौ.विद्या पाटणकर**

यांना घरकुल मधे सर्वजण "पाटणकर मावशी" म्हणून ओळखतात. पाटणकर मावशी घरकुलच्या जुन्या सहकाऱ्यांपैकी एक. पिंपळगाव बहुला येथे घरकुल स्थलांतरित झाले म्हणजेच २०१३ पासून त्या घरकुल मध्ये कार्यरत आहेत.

त्यांची मुख्य जबाबदारी म्हणजे मुलींना आजारपणात औषधे देणे, दवाखान्यात घेऊन जाणे, हॉस्पिटल मध्ये दाखल करायची वेळ आली तर मुलींचे नातेवाईक येईपर्यंत आजारी मुलींबरोबर थांबणे.

मुलींची व्ययक्तिक स्वच्छता याच्या कडे त्यांचे बारीक लक्ष असते. नियमितपणे मुलींचे नखं कापणे, हेअर कटिंग करणे, ही सर्व कामे त्या आपलेपणाने व प्रेमाने करतात. तसेच पालकांना मुलींच्या औषधे इत्यादी संबंधी संपूर्ण माहिती देतात.

अशा विश्वासू सहकार्याच्या तळमळीनं झोकून देऊन काम करण्याच्या प्रवृत्तीमुळेच घरकुल ची वाटचाल समृद्ध होत आहे.

## मोलाचे सहकार्य

या काळात अनेक दानशूर व्यक्तिंनी घरकुल ला भेट देऊन वस्तु रुपाने अथवा रोख स्वरुपात देणगी देऊन मोलाचे सहकार्य केले. या त्यांच्या सहकार्यामुळे घरकुल च्या अनेक उपक्रमात भरीव
मदत झाली.

**सगळ्यांना त्या साठी कृतज्ञतेचा नमस्कार !**

## भेटीगाठी (जुलै ऑगस्ट सप्टेंबर) व कार्यक्रम

# जुलै

- गुरुपौर्णिमा - गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमानिमित्त Espalier The Experimental School चे संचालक श्री सचिन उषा विलास जोशी आणि प्राजक्ता जोशी यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते.
- स्वामीनारायण इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने आयोजित स्पर्धेत समूह नृत्य सादर केले

# ऑगस्ट

- Espalier The Experimental School ला भेट.
- इनर व्हील क्लब नाशिक यांच्या STRONG WOMEN STROGER WORLD या कार्यक्रमात आदितीचा पाण्याचा जोगवा नृत्य सादर.
- घरकुल मध्ये ७६ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.
- अशोका मेडीकव्हर हॉस्पिटलच्या वतीने मेडिकल चेकअप कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.
- Sidewall येथे रक्षा बंधन साजरे केले.











# सप्टेंबर

- शिक्षक दिना निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांना निमंत्रित केले होते.
- KPIT Pune या कंपनीचे प्रमुख रवी पंडित सर यांनी भेट दिली.
- Tisser Artisans Trust यांच्या तर्फे दोन दिवसीय वारली पेंटिंग व ज्वेलरी मेकिंग वर्कशॉप मध्ये घरकुलच्या शिक्षिका पल्लवीताई,अश्विनीताई,सावित्रीताई,व पूर्वाताई यांनी प्रशिक्षण घेतेले.
- जिवलग सेवाभावी संस्थेच्या सर्व सदस्यांनी संस्थेला भेट दिली व किराणा तसेच देणगी दिली.
- Parker Lord India Pvt. Ltd चे श्री.अनुप देशमुख सर, Mrs. Stacie Dpmaszewiez व Mr. Dale Ashby आणि Parker Lord कंपनी च्या पदाधिकाऱ्यांनी घरकुलला भेट दिली.







*** आवाहन ***
**-: ऑनलाईन देणगीसाठी :-**

देणगीस ८०जी अन्वये आयकरात सुट

A/C Name : Gharkul Parivar Sanstha
Bank Name : Bank of India
Branch : Shivaji Udyan, Nashik
A/C No. : 080610110000256
IFSC : BKID0000806



स्वातंत्र्य दिनानिमत्त पार्कर लॉर्ड कंपनीमध्ये देशभक्तीपर गीत सादर केले.



महाराष्ट्र टाईम्स चे माजी संपादक श्री.अशोक पानवलकर यांची संस्थेला भेट




श्रीमती विजया बलदोटा व सहपरिवाराने घरकुलला भेट दिली.व
आदिती व उषा यांचा वाढदिवस साजरा केला.



**आमचे शिक्षक आमचा अभिमान!**

## घरकुल चा मूल्य विचार

" शिस्त आणि नम्रता शिकवली घरकुलने
ज्ञानात भर पडली त्याच वागणूकी ने
स्वच्छता आणि आरोग्याची शिकवण दिली घरकुलने
शरीर संपत्ती प्राप्त झाली याच गुणांनी प्रामाणिक पणा जपला सर्वांनी
घरकुल झाले मोठे याच गुणांनी
आदर आणि विश्वास संपादन केला घरकुलने
म्हणून तर तुम्हासारखे भेटले पुण्य फळाने
सर्वांना सुरक्षितता दिली घरकुलने
सर्व मुल्यांचे ज्ञान दिले आमच्या बाईंनी
ही मूल्यसप्तपदी आत्मसात केली सर्वांनी
घरकुलचा स्वर्ग बनविला याच पवित्र्याने. "

**सौ जयश्री कुशारे**
**घरकुल**